पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

**कार्यपत्रिका क्रमांक ५०**

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. २०/२/२०१८** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **महात्मा जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

## उप आयुक्त, विभागीय कार्यालय यांचे कामकाजाचा आढावा

**विषय क्र. २१७६**

पुणे महानगरपालिका क्षेत्रिय आयुक्त, परिमंडळ क्र. २ अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयांकडील माहे जानेवारी २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/क्षेआप २/९९० दि.७/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१७७**

उप आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र. ५) चा माहे जानेवारी २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.प्र.उप आयुक्त, परिमंडळ क्र. ५ यांचे जा.क्र. उआ–५/३१२० दि. ७/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१७८**

सह महापालिका आयुक्त, (परिमंडळ विभाग क्र. ४) चा माहे जानेवारी २०१८ चा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांचे जा.क्र. मआ–४/२८१२ दि.९/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१७९**

उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ कार्यालयाचे नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालयाकडील दि. १/१/२०१८ ते दि.३१/१/२०१८ पर्यंतच्या कामकाजाचा मासिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.उप आयुक्त, परिमंडळ क्र.३ यांचे जा.क्र. उआप–३/३८७४ दि.९/२/२०१८ चे पत्र.

## मा.सभासदांचे प्रस्ताव

**विषय क्र. २१८०**

मा.सौ.दिशा माने व मा.प्रकाश कदम यांचे दि. १२/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. ३८ ड, मध्ये भगवान महावीर उद्यानामध्ये शौचालय, ट्रॅक, सिमाभिंत व उर्वरित कामे करणेसाठी र.रू.२० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, CE26A336/SU1-468, प्रभाग क्र. ३५ अ, ऑक्सिजन प्रभाग करणेसाठी प्रकल्प राबविणे. | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>प्रभाग क्र. ३८ ड, मध्ये भगवान महावीर उद्यानामध्ये शौचालय, ट्रॅक, सिमाभिंत व उर्वरित कामे करणे. | --- | २० लाख |

**विषय क्र. २१८१**

मा.सौ.सुनिता गलांडे व मा.सौ.शितल शिंदे यांचे दि. १२/१/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.५ अ मध्ये विविध विकासाची कामे करणेसाठी र.रू.१५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, १०.ग.विद्युत विभाग, पान क्र. १०२, अ.क्र. ४, शहरातील विविध ठिकाणी प्रकाश व्यवस्था करणे, (यादी क्र. एसबी५), पान क्र. १९८, अ.क्र. ६५, प्रभाग क्र.५ अ राजे छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात विद्युत विषयक कामे करणे. | १५ लाख | --- |
| **<u>नवीन सुचविलेली कामे</u>** | | |
| १)प्रभाग क्र.५ अ मध्ये विविध विकासाची कामे करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.५ अ मध्ये विविध ठिकाणच्या ड्रेनेज लाईन साफ करणे | --- | ५ लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

**विषय क्र. २१८२**

मा.सौ.पल्लवी जावळे व मा.संजय भोसले यांचे दि. १२/२/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिका भवन रचना विभागामध्ये इंटेरीअर डीझाईनर ॲण्ड डेकोरेटर या पदावर श्री.राहुल सोमनाथ आल्हाट, द रीयल कंन्सेप्ट इंटेरीअर डीझाईनर ॲण्ड डेकोरेटर या नावे फर्म असुन तसेच त्यांना कामाचा ५ वर्षाचा अनुभव आहे. तरी त्यांची पॅनेलवर नियुक्ती करण्यात यावी.

**विषय क्र. २१८३**

मा.सचिन दोडके यांचे दि. १४/२/२०१८ चे पत्र.

ऑक्टोंबर २०१७ मध्ये ११ गावांचा पुणे महानगरपालिकेत समावेश झाल्याची अंतिम अधिसूचना राज्यशासनाने जाहिर केली असून उपरोक्त ११ गावातील ग्रामपंचायती नजीकच्या प्रभागांना जोडून कर्मचाऱ्यांचे वेतनही दिले जात आहे. या ११ ग्रामपंचायतीच्या गावातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक, उपशिक्षक, पदवीधर शिक्षक मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख इत्यादी पदांवर एकूण १५१ कर्मचारी काम करीत आहेत. त्यापैकी ७५% पेक्षा जास्त महिला कर्मचारी आहेत.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.मपाह१९९७/प्र.क्र.६४५/५६(४७) दि.२०/७/१९९९ अन्वये त्यावेळच्या समाविष्ट गावातील जिल्हा परिषद शिक्षकांना पुणे महानगरपालिका सेवेमध्ये सामावून घेण्यात आले होते.

त्याच अनुषंगाने नुकतेच पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या ११ गावातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक, उपशिक्षक, पदवीधर शिक्षक मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख इत्यादी पदांवर एकूण १५१ कर्मचाऱ्यांना मनपा सेवेमध्ये सामावून घ्यावे.

**विषय क्र. २१८४**

मा.योगेश ससाणे व मा.बाळा ओसवाल यांचे दि. १४/२/२०१८ चे पत्र.

पुणे महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाकडे सध्या चालू असलेल्या संगणकीकरणाच्या बदल्यात जाहिरात हक्क दिलेल्या टेंडरचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. प्रशासनाकडून या कामाचे ९ वर्षे कार्यकाळ होवून देखील तांत्रिक व नियमित ऑडिट झालेले नाही, ही बाब दुर्देवी व खेदजनक आहे. सदर टेंडरची मुदत संपुष्टात आल्यावर पुन्हा नुतनीकरण अथवा नव्याने टेंडर मे.सुप्रा पब्लिसिटी यांस देण्यात येवू नये. महापालिकेने ई गर्व्हनन्स अंतर्गत स्वतः सॉफ्टवेअर विकसित करून सदर काम करावे. याकामासंबधी आकाशचिन्ह परवाना विभागाने मा.मुख्य सभेत दिलेल्या प्रश्नांची उत्तरे व डॉकेटमधील प्रशासनाची भूमिका ही विसंगत आहे. अवघ्या दोनशे जाहिरात फलकधारकांच्या सोयीसाठी कोट्यावधी रूपयाचे जाहिरात हक्क दीर्घकालीन स्वरूपासाठी देण्याची बाब पुन्हा घडू नये. मे.सुप्रा पब्लिसिटी यांच्या या कामासाठी नगरसेवकांनी, विविध सामाजिक संस्था व नागरिकांनी तक्रारी दिलेल्या असतानाही त्यांची दखल न घेता सदर कामास मुदतवाढ देण्याची कार्यवाही प्रशासनाकडून चालू आहे. आकाशचिन्ह व परवाना विभाग प्रमुख श्री.तुषार दौंडकर व मनपाचे संगणक प्रमुख श्री.राहूल जगताप यांची भूमिका वादग्रस्त व ठेकेदार धार्जिन असून पुणे महापालिकेचे कोटयावधी रूपयाचे नुकनास करणारी आहे.

मे.सुप्रा पब्लिसिटी यांनी मनपास सादर केलेले सॉफ्टवेअर हे १ ते २ लाखात बाजारामधून उपलब्ध होवू शकत असताना देखील या सॉफ्टवेअरच्या बदल्यात १६ कोटीहून जास्त रकमेचे हक्क देणे ही बाब आर्थिक गैरव्यवहारास उघड उत्तेजन देण्यास निर्देशित होत आहे. सद्यस्थितीत याकामासंबंधी वस्तुस्थिती ज्ञात असूनही प्रशासकीय मौन हे आम्हासारख्या नवीन लोकप्रतिनिधींना अकारण जनतेच्या रोषास पात्र करणारे आहे.

मे.सुप्रा पब्लिसिटी यांना दिलेल्या कामाची व दिलेल्या जाहिरात हक्काची मुदत संपल्यावर सदर टेंडर कायमस्वरूपी रद्द करून मनपाने संगणकीकरणाचे संबंधित सॉफ्टवेअर स्वतः कार्यान्वित करावे. तसेच राज्य शासनाचे अधिकारी श्री.तुषार दौंडकर यांचेकडून आकाशचिन्ह व परवाना विभाग प्रमुख पदाचा तसेच श्री.राहूल जगताप यांचेकडून संगणक विभाग प्रमुख पदाचा अधिभार काढावा.

**विषय क्र. २१८५**

मा.सौ.रंजना टिळेकर यांचे दि. १४/२/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.४१ ड मध्ये खालील विविध विकास कामे करणेसाठी र.रू.६० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०१७-१८ चे अंदाजपत्रक, | | |
| १)प्रभाग क्र.४१ ड कोंढवा बु. कोंढवा बु. सर्व्हे नं.६६ येथे अभ्यासिका विकसित करणे(सीई२२अे५४८/एसजे१०-६४५) | २० लाख | --- |
| २)प्रभाग क्र.४१ ड कोंढवा बु. मधील स्वामी विवेकानंद उद्यानामध्ये बुलेट ट्रेन किंवा फुलराणी बसविणे (सीई२६अे३३६/एसयु१-४९७) | ४० लाख | --- |
| <u>**नवीन सुचविलेली कामे**</u> | | |
| १) प्रभाग क्र.४१ ड कोंढवा बु. मध्ये विविध ठिकाणी रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| २) प्रभाग क्र.४१ ड मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ३) प्रभाग क्र.४१ ड कोंढवा बु. साईनगर, गोकुळनगर, टिळेकरनगर, शिवशंभो नगर परिसरामधील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| ४) प्रभाग क्र.४१ ड कोंढवा बु. साईनगर, गोकुळनगर, टिळेकरनगर, शिवशंभो नगर परिसरामधील रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| ५) प्रभाग क्र.४१ ड कोंढवा बु. येवलेवाडी, काकडेनगर, अशरफनगर, कात्रज परिसरामधील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | --- | १० लाख |
| ६) प्रभाग क्र.४१ ड कोंढवा बु. येवलेवाडी, साईनगर, सुखसागरनगर, स्वामी समर्थनगर, शिवशंभो नगर, गोकुळनगर, साईनगर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | --- | १० लाख |

मा.मुख्य सभा मान्यता देईल या भरवशावर मा.महा.आयुक्त यांनी सदर ठरावाची कार्यवाही करावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्र. २१८६**

उप आयुक्त, (परिमंडळ ३) पुणे महानगरपालिका अधिनिस्त महा.सहा.आयुक्त, वारजे कर्वेनगर कार्यालयाकडील कामांच्या दि. १/१/२०१८ ते दि. ३१/१/२०१८ पर्यंतची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे संविदा करार व तदनुषंगिक माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उआप३/९९१ दि.७/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१८७**

सह महापालिका आयुक्त, परिमंडळ विभाग क्र. ४ यांच्या अखत्यारीतील माहे जानेवारी २०१८ ची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे विषयपत्रासोबत जोडल्याप्रमाणे कार्यादेश देण्यात आलेल्या कामाची माहिती निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/प.क्र.४/१०१० दि.९/२/२०१८ चे पत्र.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्र. २१८८**

बांधकाम विभागाकडील सोमवार पेठ, शनिवार पेठ, कोथरुड, नारायण पेठ, हडपसर, महंमदवाडी, सदाशिव पेठ विभागाच्या सन २०१७-१८ मध्ये प्रस्ताव मान्य करण्यात आलेल्या संमतीपत्रापैकी तपासणीसाठी उपलब्ध झालेल्या बांधकाम प्रस्तावांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१०३५ दि. ७/२/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३४ सन २०१७-२०१८ चा विचारासाठी.

**विषय क्र. २१८९**

आरोग्यप्रमुख यांचे नियंत्रणाखालील किटक प्रतिबंधक विभागाकडील अनुदान संदर्भातील कागदपत्रांची व रजिस्टरची सन २०१३–१४ ते २०१६–१७ अखेर तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.सह महा.आयुक्त (मुख्य लेखापरिक्षक) यांनी जा.क्र. मुलेप/१०३९ दि.७/२/२०१८ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्र. ३५ सन २०१७–२०१८ चा विचारासाठी.

**ठरावान्वये आलेले अभिप्राय**

**विषय क्र. २१९०**

पुणे महानगरपालिकेचा मिळकत कर वसूल करणेसाठी नागरिकांना मिळकत करावरील व्याजात सवलत देणेसाठी व मनपाच्या मिळकत कर उत्पन्नात वाढ होणेसाठी दि.३१ मार्च २०१८ पर्यंत अभय योजना सुरू करण्याबाबत मा.प्रमोद भानगिरे यांचे दि. २०/१/२०१८ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. २००७ दि. २३/१/२०१८ ला अनुसरुन मा.महा.आयुक्त यांनी जा.क्र. मआ/कआकाकरसंक/१०३० दि.१४/२/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

**सर्वात कमी रकमेचे टेंडर्स**

**विषय क्र. २१९१**

प्रभाग क्र. २२ जेष्ठ समाजवादी नेते ग.प्र.प्रधान उद्यान येथे उर्वरित विविध विकासाची कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.आनंद बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,८३१=२५ पेक्षा २३.७५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ३८,१२,३७१=३२ पर्यंत काम करून घेणेस व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/उद्यान/१०२८ दि.१२/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१९२**

नानावाडा या दगडी बांधकामातील ऐतिहासिक वास्तु व परिसरातील धोकादायक भागाची अत्यावश्यक डागडूजी, जतन संवर्धन व तद्नुषंगीक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.विशाल ॲन्ड आकाश असोसिएटस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ५३,९८,९४४/– पेक्षा १.०२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५३,४३,८७४=७७ रकमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०३२ दि. १४/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१९३**

प्रभाग क्र. ७० अ मधील स.नं.१९ धनकवडी शंकर महाराज मठामागे महिलांकरिता आधार केंद्र उभारणे भाग–२ कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ९ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.ओम कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६८,५१,७४५/– पेक्षा २४.१२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ५१,९९,१०४=१० पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०३३ दि. १४/२/२०१८ चे पत्र.

**विषय क्र. २१९४**

प्रभाग क्र. २३ ड मध्ये अग्निशामक केंद्र विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोहित कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.९७,२१,३४१/– पेक्षा २३.२३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ७४,६३,०७३=४८ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/भवन/१०३४ दि. १४/२/२०१८ चे पत्र.

## मागील सभेचे विषय

**विषय क्र. २१९५**

२४ बाय ७ समान पाणीपुरवठा योजने अंतर्गत यापूर्वी मनपाकडून २८१८ कोटींची काढण्यात आलेली निविदेच्या एस्टिमेटमध्ये तब्बल र.रू.२९० कोटी रूपयांची वाढ करणा-या या निविदेसाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारास काळया यादीत टाकण्यात यावे व प्रकल्प सल्लागाराविरूध्द कडक कारवाई करण्याबाबत मा.अविनाश बागवे, मा.प्रिया गदादे, मा.रविंद्र धंगेकर, मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.साईनाथ बाबर यांचे दि.१५/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.स्थायी समिती ठराव क्र. १३२१ दि. २१/११/२०१७ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त (वि) यांनी जा.क्र. मआ/पापु/८३४ दि. १६/१/२०१८ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.३१/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २१९६**

पुणे महानगरपालिकेमार्फत पुणे शहरातून त्या त्या आर्थिक वर्षात परदेशात उच्च शिक्षण (पदवी नंतरच्या वैद्यकीय /अभियांत्रिकी /संगणकीय/व्यवस्थापन /विधी /वाणिज्य इ.) घेण्यासाठी जाणाऱ्या मागासवर्गीय एकूण ५ विद्यार्थ्यांना तसेच आर्थिक दुर्बल घटकातील पांच विद्यार्थांनाही प्रत्येकी र.रु.२ लाख एकदाच अर्थसहाय्य देणेसाठी मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा. आयुक्त यांचे जा. क्र. मआ/ सविवि/५३२, दि.१६/११/२०१७ चे पत्रावर झालेला मा.महिला व बाल कल्याण समिती सभा ठराव क्र.१६८ दि.१०/१/२०१८ चा विचारासाठी.

(टिप : सदर विषयाचा विचार पंधरा दिवसांनी करावा असे दि.३१/१/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

**विषय क्र. २१९७**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २४३ अन्वये पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी सार्वजनिक वाहनतळ धोरणास (पार्किंग पॉलिसीस) मा.स्थायी समिती मार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मुअ(प्र)/९५८ दि.१/२/२०१८ चे पत्र.

(टिप : सदर विषयाचा विचार पुढील सभेत करावा असे दि.१२/२/२०१८ च्या सभेत ठरले होते.)

## संकिर्ण

**विषय क्र. २१९८**

शिक्षक सहयोगी व मॉडेल स्कूल या दोन उपक्रमांसाठी पुणे मनपा व पुणे सिटी कनेक्ट या संस्थेबरोबर करारनामा करणे आवश्यक असल्याने पुणे सिटी कनेक्ट व शिक्षण विभाग (प्राथमिक) यांचेतील सामंजस्य करारनामा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/शिमं/१०२९ दि.१४/२/२०१८ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**